<u>सं.फौ.ख.क्र.१११९/२०२४</u>
शासन–वि–परशुराम हिले.
नि.क्र.८ लगत.

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ यांची जबानी</u>**
मी याद्वारे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,
नाव – सिता परशुराम हिले,
वय – ३३ वर्षे, व्यवसाय – गृहिणी,
राहणार– गट क्र. ७, एसआरपीएफ कॅम्प, ता. दौंड, जि. पुणे.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. पी. आधंळे यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–</u>**

१. दि. १६.०३.२०२४ रोजी संध्याकाळी ७.०० वाजता काय घटना घडली याची मला माहिती नाही. त्या घटनेबाबत मी माझ्या बहिणीला फोन करुन सांगितले व बहिण आणि भाऊ माझ्या घरी आले असे काही घडले नव्हते. सदर दिवशी माझ्या पतीच्या पिस्तुलीतून फायरींग झाला असे काही घडले नव्हते. दि. २१.०३.२०२४ रोजी मी पोलीसांकडे जबाब नोंदविण्यासाठी गेले होते. पोलीसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे जबाब नोंदविला असे काही घडले नाही.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षास पाठिंबा देत नसल्याचे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी नमुद केले व साक्षीदारास उलटतपासणी सदृष्य प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी देण्यात आली.</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. १६.०३.२०२४ रोजी माझे पतीने दारुच्या नशेत त्यांच्या पिस्तुलीमधून घरात गोळी झाडली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर घटनेबाबत मी माझ्या बहिणीला फोन करुन सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, बहिणीने माझ्या पतींना विचारणा केली असता नशेमध्ये निष्काळजीपणात झाले असे माझे पती म्हणाले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या जबाबातील **<u>आधोरेकित भाग क</u>** चा मजकूर मी सांगितल्याप्रमाणे पोलीसांनी नोंदवून घेतला होता व तो खरा व बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे पतीला वाचवण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एम. जे. के. शेख यांनी नाकारला.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत. समक्ष

sd/-

**[ श्रीमती एस. ए. विराणी ]**
दिनांकः– १२.०६.२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दौंड, जि. पुणे.